ePaper
“कर्नाटक सरकारचा दडपशाहीचा प्रयत्न”, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सुनावले

‖ वर्ष - 8 । अंक -152 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 10 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- फलंदाजांची कामगिरी निराशाजनक
- हेडला वाद घालणं पडणार महागात
- मशीद बांधण्यासाठी १ कोटी देणार
- सीरियावर बंडखोरांचा ताबा!

### शिवसेना नेते उदय सामंत यांचे भाकीत

# राष्ट्रवादीचे जयंतराव महायुतीत जाणार?

## » योग्य वेळी योग्य निर्णय : जयंत पाटलांच्या वाक्याने तर्कवितर्क

**। मुंबई । महाईन्यूज**

**महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन झालं. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यानंतर विधिमंडळाचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं होतं. या अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. या अधिवेशनामध्ये आमदारांचा शपथविधी पार पडला. विशेष अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस असल्यामुळे राज्यातील काही प्रमुख नेत्यांची भाषणं झाली. मात्र, या भाषणाच्या माध्यमातून अजित पवार आणि जयंत पाटील यांनी सभागृहात एकमेकांना चिमटे आणि टोमणे लगावले.**



दरम्यान, जयंत पाटील सभागृहात भाषण करत असताना त्यांच्या भाषणातील एक चूक अजित पवारांनी सुधारली. त्यानंतर जयंत पाटील यांनी अजित पवारांकडे पाहत केलेल्या एका विधानामुळे चर्चा रंगली आहे. ‘आपल्या पक्षाचं एक वाक्य आहे, योग्यवेळी योग्य निर्णय’, असं जयंत पाटील यांनी म्हटलं. मात्र, त्यांच्या या विधानाची मोठी चर्चा रंगली आहे. जयंत पाटील यांच्या या विधानानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी जयंत पाटील यांच्याबाबत मोठं विधान केलं. “जयंत पाटील योग्य वेळी योग्य निर्णय घेतील”, असं अमोल मिटकरी यांनी म्हटलं.

दरम्यान, यानंतर आता शिवसेनेचे (शिंदे) नेते उदय सामंत यांनीही भाष्य केलं आहे. ‘जयंत पाटील महायुतीमध्ये येणार असतील तर नक्कीच आम्हाला अभिमान वाटेल, चांगलं वाटेल’, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

### उदय सामंत काय म्हणाले?

जयंत पाटील यांच्या भाषणात झालेले उल्लेख काही वेगळे संकेत आहेत का? या प्रश्नावर बोलताना उदय सामंत म्हणाले, “ज्यावेळी विनोदाने काही चर्चा होते. सभागृहात अजित पवार जेव्हा म्हणाले की माझं पूर्ण लक्ष तुमच्यावर आहे. त्यानंतर जयंत पाटील असं बोलले आहेत की दादा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं ब्रीद वाक्य आहे की योग्य वेळी योग्य निर्णय. त्यामुळे योग्य वेळी योग्य निर्णय जयंत पाटील यांचा कसा होतो? याकडे आमचं सर्वांचं लक्ष लागलं आहे”, असं सूचक विधान उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

### काही वाक्य अधोरेखित करण्यासारखी...

आज झालेल्या भाषणात काही सूचक इशारा आहे असं वाटतं का? यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, “भाषणातील काही वाक्य अधोरेखित करण्यासारखी होती. त्यातील योग्य वेळी योग्य निर्णय हे वाक्य होतं. त्यामुळे हे सत्यात कधी उतरेल हे जयंत पाटील यांनी ठरवलं पाहिजे. जयंत पाटील यांच्यासारखे व्यक्तिमत्व, त्यांनी अनेकदा अर्थसंकल्प मांडलेला आहे. अनेक खात्याचं काम पाहिलेलं आहे. असा नेता योग्य वेळी योग्य निर्णय या टॅगलाईन खाली महायुतीमध्ये येणार असतील तर नक्कीच आम्हाला चांगलं वाटेल”, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

# कुदळवाडीमध्ये भंगार गोदामे खाक!

## » कोट्यवधी रुपयांचे नुकसान : अग्निशमन दलाच्या जवानांचे मदतकार्य

**। पिंपरी-चिंचवड।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**



कुदळवाडी येथे इंद्रायणी वजन काट्याजवळ भंगार गोदामांना सोमवारी (दि. ९) सकाळी आग लागली. यामध्ये सुमारे १०० भंगार गोदामे जळून खाक झाली. आगीमध्ये गोदामांमधील लोखंड, अल्युमिनियम, तांबे, पितळ, प्लास्टिक, कागदी साहित्य जळाले. यामध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले. सोमवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास एका भंगार गोदामात आग लागली. कामगारांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग आटोक्यात आली नाही. सकाळी सव्वा दहा वाजता आग भडकली. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी अग्निशमन विभागाला माहिती दिली. पिंपरी-चिंचवड अग्निशमन विभागाचे १३, तसेच पुणे मनपा, पीएमआरडीए मारुंजी, चाकण एमआयडीसी, हिंजवडी एमआयडीसी असे एकूण १९ बंब घटनास्थळी दाखल झाले. दुपारी बारा वाजताच्या सुमारास आग आटोक्यात आली. मात्र पुन्हा काही वेळेत आगीने पुन्हा रौद्र रूप धारण केले. इंद्रायणी वजन काट्याजवळील सुमारे १०० गोदामांमध्ये आग लागली. पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील कंपन्यांमधून खरेदी केलेले भंगार साहित्य या गोदामांमध्ये आणले जात होते. सुमारे दहा एकर परिसरात ही गोदामे पसरलेली होती.

### कुटुंबांना सुरक्षीत स्थळी हलवले.. !


मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले. घटनेची माहिती मिळताच मनपाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. आजूबाजूच्या घरांमध्ये आग पसरल्यास मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे प्रशासनाने बाजूलाच असलेल्या दहा मजली इमारतीमधील सुमारे १०० कुटुंबांना तसेच गोदामांजवळील काही कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलवले.

# पुणे-मुंबई एक्स्प्रेसवर नवीन प्रणाली!

## प्रत्येक वाहनांवर असणार नजर, नियम मोडणाऱ्यांची सुटका नाही...

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावरुन रोज मोठ्या संख्येने वाहनधारक जात असतात. हा मार्ग एक्स्प्रेस असल्यामुळे सुसाट वाहने धावत असतात. त्यावेळी अनेक वाहन धारक एक्स्प्रेस वे च्या नियमांचे पालन करत नाही. आता आयटीएमएस प्रणाली अंतर्गत महामार्गावर 52 ठिकाणी दोन्ही बाजूने कृत्रीम बुद्धीमत्तेवर (एआय) आधारित कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे आता रडारतंत्राचा वापर करुन वाहनांचा वेग मोजता येत आहे. मर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणाऱ्या वाहनांना ई-चलन पाठवण्यात येत आहे.**







### या नियमांकडे कॅमेऱ्याचे लक्ष

प्रणाली अंतर्गत बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्याद्वारे सीटबेल्ट परिधान न करणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, लेनची शिस्त न पाळणे आदी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना ई-चलान देण्यात येत आहे. मुंबई-पुणे महामार्गावर जाणाऱ्या वाहन धारकांनी वाहतूक करताना सर्व नियमांचे न केल्यास त्यांना दंड लागणार आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी दिली आहे.

**अशी आहे वेगमर्यादा**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या वतीने मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावर आयटीएमएस प्रणाली कार्यान्वित करण्यात केली आहे. मुंबई पुणे महामार्गावर घाट परिसरामध्ये हलके मोटार वाहनाची (कार) वेग मर्यादा 60 किमी प्रतितास आहे. उर्वरित सर्व वाहनांची वेग मर्यादा 40 किमी प्रतितास आहे. घाट परिसर वगळता इतर ठिकाणी हलके मोटार वाहन (कार) ह्यांची वेग मर्यादा 100 किमी प्रतितास असून उर्वरित सर्व वाहनांची वेग मर्यादा 80 किमी प्रतितास आहे.

या नियमांकडे कॅमेऱ्याचे लक्ष

प्रणाली अंतर्गत बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्याद्वारे सीटबेल्ट परिधान न करणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, लेनची शिस्त न पाळणे आदी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना ई-चलान देण्यात येत आहे. मुंबई-पुणे महामार्गावर जाणाऱ्या वाहन धारकांनी वाहतूक करताना सर्व नियमांचे न केल्यास त्यांना दंड लागणार आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी दिली आहे.मुंबई पुणे महामार्गावर अनेक वेळा अपघात झाले आहेत. हे अपघात वाहतूक नियमांचे पालन न केल्यामुळे झाले आहे. यामुळे वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघात टाळता येणार आहे. त्यामुळे शासनाकडून आता तंत्रज्ञानाचा वापर करत बेशिस्त वाहन धारकांना धडा शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे वाहन धारक नियमांचे पालन करणार नाही, त्यांना ई चलन पाठवले जाणार आहे.

# 'मन की बात'नंतर आता 'मन का गीत'

## अभिवाचन दृकश्राव्य माध्यमातून नरेंद्र मोदी यांच्या कवितांचा कार्यक्रम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मन की बात' या जनतेशी साधल्या जाणाऱ्या संवादानंतर आता 'मन का गीत' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कवितांवर आधारित कार्यक्रम शनिवारी (१४ डिसेंबर) गीत, संगीत, नृत्य, अभिवाचन आणि दृकश्राव्य माध्यमातून रसिकांसमोर सादर होणार आहे.**



### संगीत संयोजनाची बाजू सांभाळली

मोदी यांच्या 'आँख ये धन्य है' आणि 'साक्षी भाव' या पुस्तकांमधील कवितांवर आधारित 'मन का गीत' या विशेष कार्यक्रमाची निर्मिती संस्कृती प्रतिष्ठान आणि संवाद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे. कार्यक्रमाची संकल्पना सुनील महाजन यांची असून संहितालेखन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. माधवी वैद्य यांचे तर दिग्दर्शन प्रसिद्ध अभिनेते योगश सोमण यांचे आहे. असून डॉ. सलील कुलकर्णी यांनी संगीत संयोजनाची बाजू सांभाळली आहे.

पुण्यात शुभारंभाचा प्रयोग होणाऱ्या या कार्यक्रमाचे राज्यभरात विविध ठिकाणी तसेच दिल्लीमध्ये प्रयोग होणार आहेत.मोदी यांच्या 'आँख ये धन्य है' आणि 'साक्षी भाव' या पुस्तकांमधील कवितांवर आधारित 'मन का गीत' या विशेष कार्यक्रमाची निर्मिती संस्कृती प्रतिष्ठान आणि संवाद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे. कार्यक्रमाची संकल्पना सुनील महाजन यांची असून संहितालेखन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. माधवी वैद्य यांचे तर दिग्दर्शन प्रसिद्ध अभिनेते योगश सोमण यांचे आहे. नृत्य दिग्दर्शन निकिता मोघे यांनी केले असून डॉ. सलील कुलकर्णी यांनी संगीत संयोजनाची बाजू सांभाळली आहे.बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. मोदी यांच्या जयश्री जोशी यांनी अनुवादित केलेल्या आणि उत्कर्ष प्रकाशनने प्रकाशित केलेल्या मराठी कवितांच्या 'नयन हे धन्य हे' या पुस्तकाचे प्रकाशन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असून नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती नीलेश कोंढाळकर आणि सुनील महाजन यांनी सोमवारी दिली. पुस्तकातील निवडक कविता व गीतांचे अभिवाचन सुप्रसिद्ध अभिनेत्री शर्वरी जमेनिस आणि अक्षय वाटवे करणार आहेत. शिल्पा दातार, शर्वरी ओतरी, श्रुतिका अत्रे, अदिती देवधर, ईश्वरी बापट, प्राजक्ता सांभू, अंतरा बोरगावकर विविध रचनांवर नृत्यविष्कार सादर करणार आहेत. निकिता मोघे यांचे नृत्य दिग्दर्शन आहे.पुण्यात शुभारंभाचा प्रयोग होणाऱ्या या कार्यक्रमाचे राज्यभरात विविध ठिकाणी तसेच दिल्लीमध्ये प्रयोग होणार आहेत.

## कुदळवाडीतील आगीच्या पार्श्वभूमीवर 'फास्ट ट्रॅक'वर कारवाई

# बांगलादेशी, रोहिंग्यांचा आता 'बंदोबस्त'!

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश,आमदार लांडगे यांची माहिती

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये चिखली-कुदळवाडी भागातील बेकायदेशीर भंगार दुकानचालक आणि बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनासह अन्य सुरक्षा यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाने एकत्रितपणे 'ॲक्शन प्लॅन' तयार करावा आणि कारवाई सुरू करावी, असे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत, अशी माहिती भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



चिखली-कुदळवाडी येथे सोमवारी पहाटे भंगार दुकांना भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या दुर्घटनेमध्ये १५ ते २० दुकाने खाक झाल्याचे वृत्त आहे. मुंबईमध्ये राज्य सरकारचे विशेष अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार महेश लांडगे यांनी या मुद्याकडे लक्ष वेधले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र दिले आहे. याची तातडीने दखल घेत कारवाईचे निर्देश दिले आहेत.

आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे की, औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील चिखली-कुदळवाडी या भागात मोठ्या प्रमाणात भंगार व्यावसायिकांची दुकाने आहेत. अनेकदा तक्रार आणि कारवाई करुनही पुन्हा या ठिकाणी भंगारचा धंदा केला जातो. या ठिकाणी अनधिकृतपणे कचरा जाळला जातो. त्यामुळे अनेकदार आगीच्या घटना घडल्या आहेत. परिणामी, परिसरातील नागरिक, सोसायटीधारकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. सोमवारी पहाटे पुन्हा एकदा चिखलीमध्ये गोडाऊनला भीषण आग लागली आहे. घटनास्थळी महानगरपालिकेची नऊ अग्निशमन दलाची वाहनांच्या माध्यमातून घटनास्थळी मदतकार्य सुरू आहे. या दुर्घटनेत १५ ते २० भंगार दुकाने खाक झाली आहे.

काही किलोमीटर अंतरावरून धुरांचे लोट दिसत असल्याने ही आग किती भीषण होती, याचा अंदाज येतो. पर्यावरण आणि नागरी आरोग्याची हानी मोठ्याप्रमाणात होते आहे.

### राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न...

गंभीर बाब म्हणजे, पिंपरी-चिंचवडमध्ये गेल्या वर्षभरामध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे शहरात वास्तव्य करणाऱ्या ७० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली. काही घुसखोर देशविघातक कृत्यांशी संबंधित आहेत, हेसुद्धा तपासात समोर आले आहे. बहुतांशी बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंगे अशा भंगार दुकानांवर काम करतात. पिंपरी-चिंचवड पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणांनी सातत्याने कारवाई सुरू ठेवली आहे. असे असले तरी, पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक आहे, अशी भूमिका आमदार लांडगे मांडली. त्यावर तातडीने कारवाई करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत.

> चिखली-कुदळवाडीमध्ये भंगार दुकानाला आगीच्या घटना वारंवार होत आहे. सदर दुकाने बेकायदेशीर आहेत. स्थानिक प्रशासनाकडून कारवाई केली जाते. मात्र, पुन्हा ही दुकाने थाटली जातात. या दुकानांमध्ये बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंगे काम करीत असल्याचा संशय आहेत. काही घटनांमध्ये ही बाब समोर आली आहे. त्यामुळे शहराच्या सुरक्षेबाबत या घटनांचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासन, गुप्तचर यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने चिखली-कुदळवाडीसह पिंपरी-चिंचवडमधील बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांचा कठोर बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने राज्याच्या गृहविभागाने धोरणात्मक निर्णय घेवून तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. तसे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.
>
> -महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## महायुतीच्या विजयात शंकर जगताप यांचा सिंहाचा वाटा!

### समन्वयक सदाशिव खाडे यांचे मत : विधानसभा निवडणूक निकालाच्या विश्लेषणाचा अहवाल

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील महायुतीचा विजय हा भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कणखर व प्रेरणादायी नेतृत्वामुळे शक्य झाला. पक्षाने बूथ स्तरावर ५१ टक्के मतांचे उद्दिष्ट दिलेले असताना पक्षाच्या बूथ, मंडल व जिल्हा स्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील तीन विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यापेक्षा कितीतरी जास्त मते मिळवत निर्विवाद विजय मिळवला व भाजपच्या वर्चस्वाची पावती दिली, असे मत पिंपरी-चिंचवड शहरातील महायुतीचे समन्वयक सदाशिव खाडे यांनी व्यक्त केले.**




शहरातील निवडणूक निकालांचे विश्लेषण करणारा अहवाल खाडे यांनी नुकताच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पाठविला आहे. शहराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून गेल्या दीड वर्षात शंकर जगताप यांच्या सूक्ष्म नियोजन, आहोरात्र मेहनत आणि कार्यकर्त्यांना दिलेल्या विश्वासामुळे महायुतीला विजय प्राप्त झाला. याच कारणामुळे त्यांचे नेतृत्व हे महत्त्वपूर्ण ठरले, ज्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात महायुतीचा विजय निर्विवाद आहे, असे खाडे यांनी अहवालात म्हटले आहे.

**चिंचवड मतदारसंघाचा विक्रमी विजय**

चिंचवड मतदारसंघात भाजपचे शंकर जगताप यांनी २,३५,३२३ मते मिळवून १,०३,८६५ मतांची लक्षणीय आघाडी मिळवली. यामुळे, त्यांनी राज्यातील सर्वाधिक मते मिळवणाऱ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. या मतांची टक्केवारी ६०.७३% आहे, ही शंकर जगताप यांच्या प्रभावी कार्याची आणि जनतेच्या विश्वासाची साक्ष आहे, असे खाडे यांनी म्हटले आहे.

**भोसरी मतदारसंघातील हॅटट्रिक**

भोसरी मतदारसंघात भाजपचे महेश लांडगे यांनी विजयाची हॅटट्रिक केली. २,१३,६२४ मते मिळवून त्यांनी ६३,७६५ मतांच्या फरकाने विरोधकांवर मात केली. त्यांनी मिळवलेली ५७.१% मते ही त्यांच्या लोकप्रियतेची, केलेल्या कामाची पावती म्हणावी लागेल. त्याच बरोबर शंकर जगताप यांच्या नियोजनामुळेही भोसरीत पक्षाला मोठा विजय मिळवता आला, असे खाडे यांनी अहवालात नमूद केले आहे.

**पिंपरी मतदारसंघातील भाजपचे प्रभावी काम**

पिंपरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे अण्णा बनसोडे १,०९,२३९ मते मिळवून विजय मिळवला. झालेल्या मतदानापैकी सुमारे ५४ टक्के मते बनसोडे यांना मिळाली. या मतदारसंघात भाजपची ताकद मोठी असून ती बनसोडे यांच्या मागे उभी करण्यात शंकर जगताप यांची भूमिका निर्णायक ठरली, असे खाडे यांनी म्हटले आहे. मतदानवाढीचा परिणाम चिंचवड, भोसरी आणि पिंपरी येथील मतदानात एकूण १% ते १.५% वाढ झाली, ज्याचे श्रेय महायुतीच्या प्रभावी मतदान व्यवस्थापनाला आहे. चिंचवडमध्ये ३.०७% जास्त मतदान झाले, तर भोसरीत १.४३% आणि पिंपरीत १.०१% जास्त मतदान झाले. या वाढीमुळे महायुतीला ८०% मतदानाचे लाभ मिळाले, त्यांचा परिणाम म्हणून महायुतीला निर्णायक विजय मिळाला, असे विश्लेषण खाडे यांनी केले आहे. ४

### शंकर जगताप यांचे नेतृत्व कौशल्य

शंकर जगताप यांनी निवडणूक योजनेतील प्रत्येक गोष्टीवर विशेष लक्ष दिले. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि सक्रियता निर्माण केली. नाराज कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र करून, सर्व घटकांना जोडून एकत्रितपणे काम केले. शंकर जगताप यांच्या संघटन कौशल्यामुळे झोपडपट्ट्यांपासून उच्चभ्रू सोसायट्यांपर्यंत प्रत्येक मतदार वर्गापर्यंत पोहोचता आले, असे निरीक्षण खाडे यांनी नोंदविले आहे.



## भूमिका

# शहांचे काँग्रेस पराभवाचे सत्यकथन!

**महाराष्ट्र आणि हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपण का पराभूत झालो याचे मूल्यमापन करण्याची बहुधा काँग्रेसला गरज वाटत नसावी. नाहीतर संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये त्यांची भाजपविरोधातील रणनीती फसली नसती. ज्या कारणांमुळे काँग्रेसचा पराभव झाला तेच मुद्दे काँग्रेस संसदेमध्ये मांडू पाहात आहे.**

त्यातून नेमके काय साध्य होणार आहे, असे 'इंडिया' आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसच्या धुरिणांना विचारत आहेत. तरीही त्याकडे लक्ष देण्याची तसदी त्यांनी घेतलेली नाही.हे पाहिले तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे विधान काँग्रेस खरे ठरवणार असे दिसते. पाच वर्षांपूर्वी शहा म्हणाले होते की, पुढील ५० वर्षे तरी काँग्रेसला केंद्रात सत्ता मिळणार नाही! ...भाजपलाच मते देतील. मग, आम्ही हरलो असा गळा काढण्याशिवाय काँग्रेसला काहीही करता येणार नाही. अदानी समूहाच्या कथित लाचखोरीच्या प्रकरणावरून काँग्रेसने संसदेचे कामकाज आठवडाभर बंद पाडले. दोन्ही सभागृहांचे कामकाज न झाल्याने भाजपला काही फरक पडत नाही. नाही तरी केंद्र सरकार संसदेचे अधिवेशन औपचारिकता म्हणूनच घेत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी क्वचितच सभागृहांमध्ये येतात, क्वचितच इतर सदस्यांची



भाषणे ऐकतात वा त्यावर टिप्पणी करतात. विरोधकांना झोडपून काढायचे असेल तरच ते सभागृहात येतात. विरोधकांनी संविधानावर दोन दिवसांच्या चर्चेची मागणी केली होती. केंद्र सरकारने कोणतीही आडकाठी न करता ही मागणी मान्य केली. खरे तर विरोधकांनी- प्रामुख्याने काँग्रेसने- ही चर्चा मागून आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. या चर्चेला मोदी उत्तर देणार आहेत. हे उत्तर कसे असेल याची कोणालाही कल्पना करता येईल. गेल्या लोकसभेत अविश्वास ठरावावर उत्तर देताना मोदींनी विरोधकांचे कसे वाभाडे काढले हे लोकांनी पाहिले आहे. त्याचीच पुनरावृत्ती कदाचित याही वेळी होण्याची शक्यता आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासाठी संविधानाचा मुद्दा जिव्हाळ्याचा असेलही. ते लोकसभेत आक्रमक भाषण करून भाजपला नामोहरम करण्याचा प्रयत्नही करतील. पण, अखेरीस भाषण मोदी करणार आहेत. मग चर्चेचे प्रयोजन संपून जाईल आणि मोदींच्या आविर्भावाची चर्चा होत राहील. भाजपच्या राजकारणाच्या प्रकृतीचे भान काँग्रेसला अजूनही येऊ नये हा निर्बुद्धपणा म्हणायचा की अतिआत्मविश्वास, असे लोक विचारू शकतात.'इंडिया' आघाडीचे नेतृत्व आम्ही करू, असे तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी आक्रमकपणे बोलू लागल्या आहेत. बॅनर्जी यांना 'इंडिया' आघाडीतील इतर घटक पक्षनेत्यांचाही पाठिंबा आहे असे दिसते. बॅनर्जी यांची भूमिका कदाचित स्वपक्षातील सत्ता बळकट करण्याचा भाग असू शकतो. पण घटक पक्ष बॅनर्जींना पाठिंबा देत आहेत याचा अर्थ काँग्रेसचे राजकीय डावपेच त्यांना मान्य नाहीत असा होतो. इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष या पक्षांना संसदेमध्ये वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा करायची होती. उत्तर प्रदेशमध्ये संभलमधील हिंसाचारावर 'सप'ला बोलायचे होते, मणिपूरच्या हिंसाचारावर तृणमूल काँग्रेसला बोलायचे होते. काँग्रेसला फक्त अदानीविरोधातील मुद्दा उचलून धरायचा होता. अदानी हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटासाठी अडचणीचा विषय ठरतो. त्यामुळे त्यांनाही अदानीच्या मुद्द्यावरून काँग्रेसने भाजपची कोंडी करणे नको होते! त्यामुळे विरोधकांनी काँग्रेसला नको त्या मुद्द्यावरून आक्रमक होऊ नका असे ठणकावले. संसदेत 'इंडिया' आघाडीच्या दररोज होणाऱ्या बैठकीमध्येही तृणमूल काँग्रेस व 'सप'चे नेते सहभागी झाले नाहीत. अदानीच्या मुद्द्यावरून संसदेच्या आवारात होत असलेल्या निदर्शनापासूनही हे पक्ष दूर राहतात. या पक्षांनी काँग्रेसवर दबाव आणून संसदेचे कामकाज चालू केले. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याशी बोलून तडजोड केली. त्यामुळे काँग्रेसला खरे तर तोंडात मारल्यासारखे झाले. पण काँग्रेसचा नाइलाज झाला. अदानी मुद्दा लोकांच्या जगण्या-मरण्याशी निगडित नाही. संविधानाचा मुद्दा एकदा वापरून झालेला आहे.

## प्रासंगिक »

# दोन पुढे, चार मागे!

***बँकेच्या मते आपली वार्षिक वाढ सात टक्क्यांपेक्षा कमी असू शकेल. त्यामुळे सरकारचे न ऐकता, शहाण्या शिक्षकाप्रमाणे रिझर्व्ह बँक वागली...***

रिझर्व्ह बँकेच्या तिमाही पतधोरणात व्याजदर कपातीचा निर्णय घेतला गेला नाही, यात 'बातमी' नाही. व्याजदर बदलले जाणार नाहीत असा अंदाज अनेकांनी व्यक्त केलेला होता. तो बरोबर निघाला इतकेच. 'बातमी' आहे ती रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कबुलीमध्ये. देशाच्या अर्थविकासाची गती आपण प्रत्यक्षापेक्षा जास्त गृहीत धरली अशी; अप्रत्यक्षपणे का असेना; पण कबुली रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण निवेदनातून आणि नंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या पत्रकार परिषदेतून दिली गेली. पतधोरणाचा निर्णय गव्हर्नर घेत नाहीत. त्यासाठी पाच सदस्यीय समिती असते आणि त्या समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला जातो. या बैठकीचे इतिवृत्त लवकरच प्रसृत होईल. पण दिसते ते असे की या समितीचे पाचही सदस्य व्याजदर कपात करू नये या मताचे होते. म्हणजे एका अर्थी या समितीने सरकारच्या दृष्टिकोनास केराची टोपली दाखवली.

अखेर ५ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांनी शपथ घेतली. तसेच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्र्यांची पदाची शपथ आझाद मैदानामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य हजारो मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली.

# आता राज्याच्या विकासात विरोधकांचा अडथळा

आता लवकरच मंत्रिमंडळही आकाराला येईल. महाराष्ट्र विधानसभेत प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या महायुती सरकारचे सरकारचे भरीव योगदान आगामी पाच वर्षात आपल्या महाराष्ट्राला सर्वार्थाने पुढे नेण्यामध्ये असावे ही अपेक्षा सर्वांचीच आहे. त्यातही यंदा एकटा भाजप जवळपास बहुमताच्या रेषेपर्यंत पोहोचला. एवढा मोठा विजय महायुतीला आणि एवढा दारुण पराभव महाआघाडीला अपेक्षित नव्हता. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीला संख्यात्मक दृष्ट्या मोठे यश मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर तो काहींना धक्कादायक वाटणाराही होता. अर्थात मतांच्या टक्केवारीत फारसा मोठा फरक नव्हता हे खरेच. कदाचित त्यामुळे महाआघाडी आपण सत्तेवर येणारच अशा हवेत राहिली. त्यातूनच जागा वाटपाचा घोळ अर्ज भरणाऱ्या तारखेपर्यंत झाला, मुख्यमंत्रीपदावर चर्चा केली गेली. या निवडणुकीत महायुती जेवढी एकसंघ पद्धतीने लढताना दिसत होती तितकी



महाआघाडी दिसत नव्हती हे वास्तव आहे.या निवडणुकीत जनतेने भाजपच्या नेतृत्वाखालील युतीला अतिशय मोठ्या प्रमाणात निवडून दिलेले असल्याने आता राज्याच्या विकासात विरोधकांचा अडथळा आहे असे म्हणता येणार नाही. केंद्र सरकारचेही पूर्ण सहकार्य राज्य सरकारला असणार आहे.

त्यामुळे राज्याची सर्व आघाड्यांवर होत असलेली घसरण थोपवून हे राज्य देशातील सर्वात अग्रगण्य राज्य म्हणून आघाडीवर आणण्याची संधी देवेंद्र फडणवीस यांना आहे. शिवाय त्यांचे भाजपमधील स्थान व वलय मोदी आणि शहा यांच्या पाठोपाठ अतिशय महत्त्वाचे झाले आहे. पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरही त्यांचे वजन वाढलेले आहे. त्याचाही लाभ त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी करून घ्यावा आणि शपथविधीच्या जाहिरातीत 'आता महाराष्ट्र थांबणार नाही' असे केलेले सूतोवाच खरे ठरावे ही अपेक्षा. मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेणारे देवेंद्र फडणवीस पाच वर्षांचा कार्यकाळ दुसऱ्यांदा पूर्ण करू शकतील असे दिसते. एकूण ही नवी विधानसभा नव्या दिशेने जाताना दिसत आहे.

निवडणूक काळात महायुतीने जे जाहीरनामे प्रकाशित केले त्यामधून दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे ही नव्या सरकारची नैतिक जबाबदारी आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न घटले आहे ते वाढवणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरात व इतरत्र न जाऊ देता राज्यात रोजगार निर्मिती करणे हेही महत्त्वाचे आहे. व्यवस्थेत वाढलेला भ्रष्टाचार समूळ नष्ट करणे अशक्य असले तरी त्यावर आळा घालण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रातील सामाजिक – सांस्कृतिक वातावरण प्रदूषित होत चालले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कर्नाटकला याचा हिशेब द्यावा लागेल

## मुनगंटीवार यांनी सिद्धरामय्या यांच्यावर हल्लाबोल केला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कर्नाटक आणि महाराष्ट्र सीमा प्रश्न पुन्हा एकदा तापला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीकडून बेळगावमध्ये मराठी भाषिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मात्र, या मेळाव्यास कर्नाटक सरकारने विरोध केला. त्यावरून पुन्हा एकदा महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक असा संघर्ष तापला आहे. याचे पडसाद महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात देखील पाहायला मिळाले. यावरून राजकीय प्रतिक्रिया येत आहेत.**



अशातच कर्नाटकमधील सिद्धरामय्या यांच्या सरकारने कर्नाटकच्या विधानसभेतील स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा हटवण्याचा निर्णय घेतला असल्याचं सांगितलं जात आहे. यावरून नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. दरम्यान, आता यावरून भाजपाच्या नेत्यांकडून कर्नाटक सरकारवर टीका करण्यात येत आहे. यासंदर्भात आता भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया देत सिद्धरामय्या यांच्यावर हल्लाबोल केला आहे. “कर्नाटक सरकारला याचा हिशेब द्यावा लागेल”, असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.कर्नाटकच्या विधानसभेतील स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा हटवण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. यासंदर्भात विचारलं असता सुधीर मुनगंटीवार म्हणाले, “खरंच हे खूप गंभीर आहे, कर्नाटक सरकारला याचा हिशेब द्यावा लागेल. ज्यांनी-ज्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करण्याचा प्रयत्न केला. ते-ते एकतर पराभूत झालेत किंवा बुडलेत. आता पुढचा नंबर कर्नाटक सरकारचा आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा आहे. मी हे विश्वासाने सांगतोय आज लेहून घ्या. पुढच्या निवडणुकीत कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा पराभव होईल. कारण त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केला आहे”, असा हल्लाबोल सुधीर मुनगंटीवार यांनी केला.कर्नाटकातील काँग्रेस सरकारनं विधानसभा सभागृहातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा काढून टाकण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातना, त्यांचे बलिदान आणि त्यांचे विचार यांची अवहेलना करण्याचा काँग्रेसचा हा डाव आहे. सत्तेसाठी लाचार झालेले आणि मतांसाठी हिंदुत्ववादी भूमिका सोडलेले उद्धव ठाकरे याचा निषेध करणार की नेहमीप्रमाणे मूग गिळून गप्प बसणार? काँग्रेससोबत आघाडी करताना ठाकरे यांनी सावरकरांच्या विचारांना मूठमाती दिली आहे. त्यामुळेच आज त्यांना ‘टीपू सेना’ म्हणण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार अमर आहेत. त्यांचा अपमान करणाऱ्या काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांना इतिहास कधीही माफ करणार नाही”, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.अशातच कर्नाटकमधील सिद्धरामय्या यांच्या सरकारने कर्नाटकच्या विधानसभेतील स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा हटवण्याचा निर्णय घेतला असल्याचं सांगितलं जात आहे. यावरून नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. दरम्यान, आता यावरून भाजपाच्या नेत्यांकडून कर्नाटक सरकारवर टीका करण्यात येत आहे. यासंदर्भात आता भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया देत सिद्धरामय्या यांच्यावर हल्लाबोल केला आहे. “कर्नाटक सरकारला याचा हिशेब द्यावा लागेल”, असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.कर्नाटकच्या विधानसभेतील स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा हटवण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. यासंदर्भात विचारलं असता सुधीर मुनगंटीवार म्हणाले, “खरंच हे खूप गंभीर आहे, कर्नाटक सरकारला याचा हिशेब द्यावा लागेल. ज्यांनी-ज्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करण्याचा प्रयत्न केला. ते-ते एकतर पराभूत झालेत किंवा बुडलेत. आता पुढचा नंबर कर्नाटक सरकारचा आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा आहे. मी हे विश्वासाने सांगतोय आज लेहून घ्या. पुढच्या निवडणुकीत कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा पराभव होईल. कारण त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केला आहे”, असा हल्लाबोल सुधीर मुनगंटीवार यांनी केला.कर्नाटकातील काँग्रेस सरकारनं विधानसभा सभागृहातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

### इतिहास कधीही माफ करणार नाही

हा निर्णय अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातना, त्यांचे बलिदान आणि त्यांचे विचार यांची अवहेलना करण्याचा काँग्रेसचा हा डाव आहे. सत्तेसाठी लाचार झालेले आणि मतांसाठी हिंदुत्ववादी भूमिका सोडलेले उद्धव ठाकरे याचा निषेध करणार की नेहमीप्रमाणे मूग गिळून गप्प बसणार? काँग्रेससोबत आघाडी करताना ठाकरे यांनी सावरकरांच्या विचारांना मूठमाती दिली आहे. त्यामुळेच आज त्यांना ‘टीपू सेना’ म्हणण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार अमर आहेत. त्यांचा अपमान करणाऱ्या काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांना इतिहास कधीही माफ करणार नाही.

---

# कर्नाटक सरकारचा दडपशाहीचा प्रयत्न

## महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्न जिव्हाळ्याचा विषय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रश्न पुन्हा एकदा चिघळण्याची शक्यता आहे. कारण बेळगावमध्ये मराठी भाषिकांचा मेळावा महाराष्ट्र एकीकरण समितीकडून आयोजित करण्यात आला होता. मात्र, या मेळाव्यास कर्नाटक सरकारने विरोध केला. त्यावरून पुन्हा एकदा महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक असा संघर्ष तापला आहे.**



याचे पडसाद महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात देखील पाहायला मिळाले. तसेच यावरून विरोधकांनी राज्य सरकारला देखील घेरलं. तसेच शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या सर्व आमदारांनी आज विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. तसेच बेळगावमधील मराठी भाषिकांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावरून आता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्न जिव्हाळ्याचा विषय असून महाराष्ट्र सरकार बेळगावमधील मराठी भाषिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचं सांगत कर्नाटक सरकारच्या दडपशाहीचा निषेध असल्याचं म्हणत उपमुख्यमंत्री शिंदेंनी कर्नाटक सरकारला सुनावलं आहे. बेळगावमध्ये मराठी भाषिकांबद्दल आणि कर्नाटक-महाराष्ट्र सिमा प्रश्न जो आहे? याबाबत शिवसेनेची भूमिका ही बेळगावमधील मराठी भाषिकांबाबतची राहिलेली आहे. मराठी भाषिकांच्या पाठिमागे शिवसेना खंबीर उभी आहे. तसेच बेळगावबाबत माझी भूमिका देखील जिव्हाळ्याची आहे. कारण १९८६ साली जे आंदोलन झालं. त्या आंदोलनामध्ये मी देखील बेळगावच्या तुरुंगात होतो. तसेच मी जेव्हा मुख्यमंत्री होतो तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री अशी संयुक्त बैठक घेतली होती. तसेच कर्नाटक-महाराष्ट्र सिमा प्रश्न हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मराठी भाषिकांवर कोणताही अन्याय होणार नाही.

### महाराष्ट्रातील जनता खंबीरपणे उभी


अशी भूमिका कर्नाटक सरकारने घ्यावी, अशा सूचना तेव्हा अमित शाह यांनी दिल्या होत्या”, असं उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं.मराठी भाषिकांचा मेळावा हा महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केला होता. मात्र, तो मेळावा होऊ नये म्हणून पुरेपूर प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. एक दडपशाही करण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. जे आंदोलनकर्ते होते ते माजी आमदार किंवा माजी महापौर असतील त्यांच्यासह शेकडो मराठी भाषिकांना तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकारने केला. त्यामुळे याचा मी निषेध करतो. महाराष्ट्र सरकारची भूमिका एकच आहे की बेळगाव मधील मराठी भाषिकांच्या पाठीशी महाराष्ट्रातील जनता खंबीरपणे उभी आहे.

# सीरियावर बंडखोरांचा ताबा!

## सीरियासाठी भारताने मित्रराष्ट्रांना एकत्र येण्याची दिली हाक

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सीरियामधील बंडखोरांनी राजधानी दमास्कसवर ताबा मिळवल्याचे आणि अध्यक्ष बशर अल असाद यांची राजवट उलथवून टाकल्याचे रविवारी (८ डिसेंबर) सरकारी वाहिनीवरून जाहीर करण्यात आले. तसेच, तुरुंगातील सर्व कैद्यांची मुक्तता करत असल्याचेही बंडखोरांनी घोषित केले.**



बंडखोर दमास्कसमध्ये शिरत असताना लष्कराने आधीच माघार घेतली होती. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर असाद यांनी दमास्कस सोडले असून त्यांनी रशियात शरण घेतली आहे. बंडखोरांनी २७ नोव्हेंबर रोजी सीरियाच्या वायव्येस मोर्चेबांधणी केली. त्यानंतर बंडखोरांनी दक्षिणेकडे सरकण्यास सुरुवात केली. या बंडखोरांच्या अनेक तळांवर गेल्या काही दिवसांमध्ये बशर यांच्या फौजांनी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या इराण, रशियासारख्या देशांनी हवाई हल्ले केले होते. परंतु, सीरियाच्या लष्कराकडे बंडखोरांचा रेटा थोपवण्याची क्षमता नव्हती. प्रत्येक ठिकाणी त्यांचा पराभव होऊ लागला. २९ नोव्हेंबर रोजी बंडखोरांनी अलेप्पो या सीरियाच्या दुसऱ्या मोठ्या शहरावर ताबा मिळवला. बंडखोरांनी ५ डिसेंबर रोजी हमा आणि ७ डिसेंबर रोजी हॉम्स हे सीरियाचे तिसरे मोठे शहर बंडखोरांनी जिंकून घेतले. इराण सध्या इस्रायलबरोबरच्या संघर्षात व्यस्त आहे. लेबनॉनमधील हेझबोला ही संघटना मरनासन्न अवस्थेत आहे. इस्रायलने लेबनॉनचं कंबरडं मोडलंय. रशियाचं बळ युक्रेनबरोबरच्या युद्धात खर्च होत आहे. त्यामुळे सीरियाला त्यांच्या मित्रराष्ट्रांकडून पुरेशी मदत मिळाली नाही. अखेर दमास्कस हे राजधानीचे शहर तुलनेने फारच कमी प्रतिकारासह बंडखोरांच्या ताब्यात आले. दमास्कस ताब्यात घेतल्यानंतर बंडखोर इराणच्या दूतावासामध्ये घुसले आणि तिथे मोडतोड केली. परिस्थिती लक्षात घेऊन इराकने आपले दूतावास रिकामे केले असून तेथील कर्मचाऱ्यांना लेबनॉनमध्ये हलवले. दरम्यान, लेबनॉनने बैरुतला दमास्कसशी जोडणारा मार्ग वगळता सीरियाबरोबरची भूसीमा बंद करत असल्याचे सांगितले आहे. आमच्या नागरिकांना देशाबाहेर जाऊ दिले जावे असे आवाहन चीनने तेथील संबंधित पक्षांना केले आहे. भारतानेही शनिवारीच आपल्या नागरिकांसाठी धोक्याची सूचना जारी केली आहे. त्याशिवाय अन्य देशही आपापल्या नागरिकांना तेथून सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या प्रयत्नात आहेत.या सर्व घडमामोडींनंतर भारत सरकारने पहिल्यांदाच तिथल्या परिस्थितीवर भाष्य केलं आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे की "सीरियामध्ये चालू असलेल्या घडामोडींवर, तिथल्या परिस्थितीवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. तिथे घडणाऱ्या घडामोडी पाहता सीरियाची एकता, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता जपण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. आम्ही सीरियन नागरिकांच्या, तिथल्या सर्व वर्गांच्या, सर्व प्रकारच्या हितसंबंधांचं रक्षण करणाऱ्या शांततापूर्ण व सर्वसमावेशक राजकीय प्रक्रियेचं समर्थन करतो. दमास्कसमधील आमचा दूतावास सीरियामधील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यांच्या संपर्कात आहे".बंडखोर दमास्कसमध्ये शिरत असताना लष्कराने आधीच माघार घेतली होती. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर असाद यांनी दमास्कस सोडले असून त्यांनी रशियात शरण घेतली आहे. बंडखोरांनी २७ नोव्हेंबर रोजी सीरियाच्या वायव्येस मोर्चेबांधणी केली. त्यानंतर बंडखोरांनी दक्षिणेकडे सरकण्यास सुरुवात केली. या बंडखोरांच्या अनेक तळांवर गेल्या काही दिवसांमध्ये बशर यांच्या फौजांनी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या इराण, रशियासारख्या देशांनी हवाई हल्ले केले होते. परंतु, सीरियाच्या लष्कराकडे बंडखोरांचा रेटा थोपवण्याची क्षमता नव्हती. प्रत्येक ठिकाणी त्यांचा पराभव होऊ लागला.

### कर्मचाऱ्यांना लेबनॉनमध्ये हलवले

२९ नोव्हेंबर रोजी बंडखोरांनी अलेप्पो या सीरियाच्या दुसऱ्या मोठ्या शहरावर ताबा मिळवला. बंडखोरांनी ५ डिसेंबर रोजी हमा आणि ७ डिसेंबर रोजी हॉम्स हे सीरियाचे तिसरे मोठे शहर बंडखोरांनी जिंकून घेतले. इराण सध्या इस्रायलबरोबरच्या संघर्षात व्यस्त आहे. लेबनॉनमधील हेझबोला ही संघटना मरनासन्न अवस्थेत आहे. इस्रायलने लेबनॉनचं कंबरडं मोडलंय. रशियाचं बळ युक्रेनबरोबरच्या युद्धात खर्च होत आहे. त्यामुळे सीरियाला त्यांच्या मित्रराष्ट्रांकडून पुरेशी मदत मिळाली नाही. अखेर दमास्कस हे राजधानीचे शहर तुलनेने फारच कमी प्रतिकारासह बंडखोरांच्या ताब्यात आले. दमास्कस ताब्यात घेतल्यानंतर बंडखोर इराणच्या दूतावासामध्ये घुसले आणि तिथे मोडतोड केली. परिस्थिती लक्षात घेऊन इराकने आपले दूतावास रिकामे केले असून तेथील कर्मचाऱ्यांना लेबनॉनमध्ये हलवले.

---

# बाबरी मशीद बांधण्यासाठी १ कोटी देणार

## पश्चिम बंगालचे तृणमूलचे आमदार हूमायूँ कबीर यांनी केली घोषणा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालमध्ये नवी बाबरी मशीद उभारणार असल्याची घोषणा तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायूँ कबीर यांनी केली आहे. मुर्शिदाबाद या ठिकाणी असलेल्या बेलडांगा या ठिकाणी बाबरी मशीद बांधली जाईल. ६ डिसेंबर २०२५ च्या आधी बेलडांगा या ठिकाणी बाबरी मशीद बांधण्याचं काम सुरु केलं जाईल अशी घोषणा हुमायूँ कबीर यांनी केली आहे.**



पश्चिम बंगालमध्ये ३४ टक्के मुस्लीम आहेत. त्यांना मान उंच करुन चालण्याची इच्छा आहे. तो त्यांचा अधिकार आहे. मी यासाठीच एक प्रस्ताव ठेवतो आहे. त्यासाठी पैशांची कुठलीही कमतरता होणार नाही. बेलडांगामध्ये जेवढे मदरसे आहेत ते मदरसे आणि बहरामपूर भागातले मदरसे यांचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या १०० हून अधिक लोकांची बाबरी मशीद ट्रस्ट तयार केली जाईल. यानंतर ६ डिसेंबर २०२५ च्या आधी बेलडांगा भागातल्या दोन एकर जमिनीवर बाबरी मशीद उभारली जाईल किंवा त्याचं काम तरी सुरु केलं जाईल." असं हुमायूँ कबीर यांनी म्हटलं आहे. कबीर पुढे म्हणाले, मुस्लीम माणसाला मान उंचावून चालण्याचा अधिकार आहे. जी बाबरी मशीद पाडण्यात आली तीच मशीद बेलडांगामध्ये उभारण्यात येईल. या मशिदीसाठी मी १ कोटी रुपये दान देणार आहे. ६ डिसेंबर २०२५ पूर्वी बेलडांगा या ठिकाणी बाबरी मशीद उभारणीचं काम सुरु केलं जाईल. असं हुमायूँ कबीरयांनी म्हटलं आहेभरतपूर विधानसभा मतदारसंघातले आमदार आहेत. ममता बॅनर्जींच्या आधीच्या सरकारमध्ये ते मंत्रीही होते. त्यांनी २०११ मध्ये पहिल्यांदा तृणमूल काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. हुमायूँ कबीर यांचं एक वक्तव्य वादग्रस्त ठरलं होतं. त्यावेळी ते म्हणाले होते की जर जिंकलो तर त्यानंतरच्या पुढच्या दोन तासांत भाजपा समर्थकांना कापून नदीमध्ये फेकून देऊ.

### हूमायूँ कबीर हे भरपतूरचे आमदार

अयोध्येत असलेली बाबरी मशीद पाडण्यात आली होती. त्यानंतर बराच काळ संघर्ष चालला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. निकालानंतर या जमिनीचा फैसला झाला. अयोध्येत आता राम मंदिरही उभं राहिलं आहे. पुढच्या महिन्यात राम मंदिराला एक वर्ष पूर्ण होईल. त्याआधीच तृणमूलच्या आमदाराने पश्चिम बंगालमध्ये राम मंदिर उभारलं जाणार असं म्हटलं आहे.पश्चिम बंगालमध्ये नवी बाबरी मशीद उभारणार असल्याची घोषणा तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायूँ कबीर यांनी केली आहे.

# ‘पुष्पा 2’ मधल्या आडनावावरुन करणी सेना आक्रमक



पुष्पा 2 हा अल्लू अर्जुन रश्मिका मंदानाचा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतो आहे. याच सिनेमातलं महत्त्वाचं पात्र आहे ते म्हणजे भैरव सिंग शेखावत. सिनेमात खलनायकी पात्र साकारणाऱ्या या पात्राच्या आडनावावरुन आता करणी सेना आक्रमक झाली आहे. निर्मात्यांनी सिनेमात असलेलं शेखावत हे आडनाव बदलावं अन्यथा मार खाण्याची तयारी ठेवावी अशी मागणी करणी सेनेने केली आहे.“शेखावत या शब्दाचा दुरुपयोग चित्रपटात करण्यात आला आहे. पुष्पा 2 या सिनेमात शेखावत आडनाव असलेल्या व्यक्तीला खलनायक दाखवण्यात आलं आहे. हा क्षत्रियांचा अपमान आहे. हे नाव लवकरात लवकर हटवण्यात आलं पाहिजे अन्यथा पुष्पा 2 च्या निर्मात्यांनी मार खायची तयारी ठेवावी” असं क्षत्रिय करणी सेनेचे संस्थापक राज शेखावत यांनी सोशल मिडीयावर सांगितलं आहे.व्हिडीओत राज शेखावत म्हणतात, “पुष्पा 2 हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला आहे. या सिनेमात पुन्हा एकदा क्षत्रिय समाजाचा अपमान करण्यात आला आहे. शेखावत ही क्षत्रिय समाजातली जात आहे. या जातीला खालच्या दर्जाचं दाखवण्यात आलं आहे. तसंच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली क्षत्रिय समाजाला बदनाम केलं जातं आहे. सिनेमाच्या निर्मात्यांनी शेखावत शब्दाचा जो गैरवापर केला आहे तो थांबवावा अन्यथा मार खायला तयार रहावं. करणी सेना पुष्पा 2 ( PUSHPA 2 ) च्या निर्मात्यांना घरात घुसून मारायलाही मागेपुढे पाहणार नाही. आम्ही आमचा अपमान कदापि सहन करणार नाही. वेळ पडल्यास कुठल्याही थराला जाऊ.” असं राज शेखावत यांनी म्हटलं आहे.पुष्पा 2 हा सिनेमा मूळ तेलगु भाषेत आहे. हा सिनेमा विविध भाषांमध्ये डब करण्यात आला आहे. या सिनेमात रश्मिका मंदाना, अल्लू अर्जुन आणि फहाद फासिल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पुष्पा हा सिनेमा सुपरडुपर हिट झाला. त्यानंतर लोक पुष्पा 2 ( PUSHPA 2 ) या सिनेमाची आतुरतेने वाट बघत होते.

# ऐश्वर्या राय-अभिषेक बच्चन दुसऱ्यांदा आई-बाबा होणार?





बॉलीवूड अभिनेता अभिषेक बच्चन व त्याची पत्नी ऐश्वर्या राय बच्चन यांच्या नात्यातील दुराव्याच्या बातम्या मागील खूप महिन्यांपासून येत होत्या. अशातच त्या दोघांचे एका लग्नातील फोटो समोर आले आहेत. त्यानंतर या अफवांना पूर्णविराम मिळाला. आता एका कार्यक्रमात रितेश देशमुखने अभिषेक बच्चनला दुसऱ्या बाळाबद्दल विचारलं. त्यावर त्याने काय प्रतिक्रिया दिली, ते जाणून घेऊयात. अभिषेक बच्चनने नुकतीच रितेश देशमुखच्या ‘केस तो बनता है’ या चॅट शोमध्ये हजेरी लावली. या शोमध्ये, रितेशने ‘ए’ अक्षरापासून सुरू होणारी नावं निवडण्याच्या बच्चन कुटुंबाच्या परंपरेचा उल्लेख केला. रितेश अभिषेकला म्हणाला, “अमिताभ जी, ऐश्वर्या, आराध्या आणि तू अभिषेक.” या सर्वांची सुरुवात ‘अ’ अक्षराने होते. मग जया आंटी आणि श्वेता यांनी काय केलं होतं?...” यावर अभिषेक बच्चन म्हणाला, “हे त्यांना विचारावं लागेल. पण कदाचित ती आमच्या कुटुंबात एक परंपरा बनली आहे. अभिषेक, आराध्या...”अभिषेकला बोलताना अडवत रितेश म्हणाला, “आराध्यानंतर?” अभिषेक म्हणाला, “नाही, पुढची पिढी आल्यावर बघू.” रितेश गमतीत म्हणाला, “एवढी वाट कोण पाहणार? जसे रितेश, रियान, राहिल (त्याची दोन मुले). मग तो म्हणाला, “वयाचा आदर कर, रितेश. मी तुझ्यापेक्षा मोठा आहे.” यानंतर रितेशने अभिषेकच्या पाया पडला आणि सगळेच हसू लागले. ऐश्वर्या राय बच्चन व अभिषेक बच्चन यांनी २००७ मध्ये लग्नगाठ बांधली होती. त्यानंतर या जोडप्याला २०११ मध्ये मुलगी झाली. त्यांच्या मुलीचं नाव आराध्या आहे. आराध्या नुकतीच नोव्हेंबर महिन्यात १३ वर्षांची झाली. तिचा वाढदिवस ऐश्वर्या व आराध्याने दणक्यात साजरा केला होता. ऐश्वर्याने लेकीच्या वाढदिवसाचे फोटो सोशल मिडीयावर शेअर केले होते. अभिषेकच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास तो नुकताच ‘आय वॉन्ट टू टॉक’ या चित्रपटात झळकला होता. येत्या काळात तो ‘हाऊसफूल 5’ व शाहरुख खानच्या ‘किंग’ चित्रपटात दिसणार आहे.

# अनुरागची लेक अडकणार विवाहबंधनात!

‘गँग्ज ऑफ वासेपूर’, ‘सेक्रेड गेम’ फेम दिग्दर्शक अनुराग कश्यपच्या घरी सध्या लगीनघाई सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. अनुरागची लाडकी लेक आलिया कश्यप येत्या काही दिवसांत विवाहबंधनात अडकणार आहे. या सोहळ्याची खास झलक दिग्दर्शकाने आपल्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. अनुराग कश्यपची लेक आलिया कश्यप नेहमीच तिच्या हटके आणि बोल्ड स्टाइलमुळे चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून आलिया कश्यप तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. २०२३ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी आलियाने बॉयफ्रेंड शेन ग्रेगोयरशी साखरपुडा केला होता. आता साधारण वर्षभराने हे जोडपं लग्नबंधनात अडकणार आहे.आलिया आणि शेन यांचा लग्नसोहळा लवकरच पार पडणार आहे. या आधी दोघांच्या घरी लगीनघाईला सुरुवात झालेली आहे. यांचा हळदी सोहळा नुकताच पार पडला असून याची खास झलक अनुराग कश्यपने इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. लाडक्या मैत्रिणीच्या हळदीला खुशी कपूर आणि दिग्दर्शक इम्तियाज अली यांची मुलगी इदा अली सुद्धा उपस्थित होती. मीडिया रिपोर्ट्सनुसार, आलिया कश्यपचा विवाहसोहळा ११ डिसेंबरला मुंबई येथील महालक्ष्मी रेसकोर्समध्ये पार पडणार आहे. आता अनेकांना प्रश्न पडला असेल अनुराग कश्यपचा होणारा जावई नेमकं काय काम करतो तसेच हा शेन ग्रेगोयर नेमका आहे तरी कोण? याच्याबद्दल थोडक्यात जाणून घेऊयात...आलिया कश्यपचा होणारा नवरा शेन ग्रेगोयर आता २४ वर्षांचा असून तो अमेरिकन उद्योजक आहे. रॉकेट पॉवर्ड साउंड नावाच्या कंपनीचा तो संस्थापक आहे. ही सॉफ्टवेअर कंपनी साउंड डिझायनिंगचं काम करते. आलिया कश्यप आणि शेन लॉकडाऊनच्या काळापासून एकमेकांना डेट करत होते.

# मराठी गाण्यावर थिरकली अदा शर्मा



अभिनेत्री अदा शर्मा ‘द केरला स्टोरी’ चित्रपटामुळे प्रसिद्धीझोतात आली. नुकताच अदाचा ‘बस्तर- द नक्षल स्टोरी’ चित्रपट १५ मार्च रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला. अदाच्या मराठमोळ्या अंदाजाने चाहत्यांना भुरळ पाडली आहे. अनेकदा सोशल मीडियावर ती मराठीत संवाद साधताना किंवा एखादे मराठी गाणे गाताना दिसते. अदा सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टी शेअर करताना दिसते. अनेकदा तिने तिच्या आजीचा उल्लेख केला आहे. एकदा तर तिने तिच्या आजीची ६५ वर्षांपूर्वीची जुनी साडी नेसली होती. अशातच आता नात अदा आणि आजीचा मराठी गाण्यावर धमाकेदार डान्स करतानाचा व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे.

# दीपिका पादुकोण तीन महिन्यांच्या लेकीला घेऊन परतली मुंबईत

अभिनेत्री दीपिका पादुकोणने नुकतीच बंगळुरूमध्ये दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये हजेरी लावली होती. तिचे फोटो व व्हिडीओ चांगलेच व्हायरल झाले होते. आई झाल्यानंतर दीपिका पहिल्यांदाच सार्वजनिक कार्यक्रमात दिसली. ती कॉन्सर्टमध्ये दिलजीतच्या लोकप्रिय गाण्यांवर थिरकली होती. कॉन्सर्टनंतर आता दोन दिवसांनी दीपिका मुंबईला परत आली आहे. दीपिका पादुकोण मागील बऱ्याच दिवसांपासून माहेरी होती. अखेर ती तिची लाडकी लेक दुआला घेऊन मुंबईला परतली आहे. मुंबईतील खासगी विमानतळावर ती लेक दुआला घेऊन पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली. वूम्पला या पापाराझी अकाउंटवरून दीपिकाचा एक व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत लाल रंगाचा ड्रेस घातलेली दीपिका लेकीला घेऊन कारमध्ये बसताना दिसत आहे.दीपिका व तिची लेक दुआ यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. चाहते व्हिडीओवर लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. अनेक चाहत्यांनी रेड हार्ट इमोजी कमेंट्स केले आहेत. या व्हिडीओत पहिल्यांदाच दुआ व दीपिका एकत्र दिसून आल्या.दीपिका पादुकोण व रणवीर सिंग लग्नानंतर सहा वर्षांनी आई-बाबा झाले. दीपिकाने तीन महिन्यांपूर्वी ८ सप्टेंबर रोजी एका गोंडस मुलीला जन्म दिला. रणवीर व दीपिका यांनी आपल्या लाडक्या लेकीचं नाव दुआ पादुकोण सिंह असं ठेवलं आहे. दुआच्या नावाची घोषणा करताना दीपिकाने तिच्या पायांचा फोटो शेअर केला होता. त्यानंतर आता पहिल्यांदाच दीपिका लेकीला घेऊन प्रवास करतानाचा व्हिडीओ समोर आला आहे.

# फलंदाजांची कामगिरी निराशाजनक!

## बुमराला साथ आवश्यक! ॲडलेड कसोटीनंतर रोहितची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियात विजय मिळवायचा झाल्यास तुम्हाला मोठी धावसंख्या उभारण्यावाचून पर्याय नाही. मात्र, फलंदाज म्हणून आम्ही कमी पडलो. तसेच गोलंदाजांनीही अधिक जबाबदारी घेणे गरजेचे आहे. जसप्रीत बुमरा कितीही भेदक मारा करत असला, तरी तो एकट्याने प्रतिस्पर्ध्याला गारद करू शकत नाही. त्याला अन्य गोलंदाजांची साथ आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतील पराभवानंतर व्यक्त केली.**



ॲडलेड येथे प्रकाशझोतात (डे-नाइट) झालेल्या या कसोटीत ऑस्ट्रेलियाने पाहुण्या भारताचा १० गडी राखून धुव्वा उडवला. केवळ अडीच दिवस चाललेल्या या कसोटीत भारतीय फलंदाजांनी सुमार कामगिरी केली. भारताला दोनही डावांत २०० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. "ऑस्ट्रेलियात खेळताना कसोटी सामना जिंकायचा झाल्यास तुम्ही मोठी धावसंख्या उभारणे गरजेचे असते. गुलाबी चेंडूविरुद्ध धावा करणे आव्हानात्मक असेल हे आम्हाला ठाऊक होते. मात्र, आम्ही अधिक चांगली फलंदाजी निश्चित करू शकलो असतो. याआधी आम्ही ते करूनही दाखवले आहे. विशेषत: पहिल्या डावात आम्ही ३०-४० धावा अधिक केल्या असत्या, तर बराच फरक पडला असता," असे रोहित म्हणाला. तसेच गोलंदाजांच्या कामगिरीवरही त्याने नाराजी व्यक्त केली. ॲडलेड कसोटीत बुमराने (४/६१) टिच्चून मारा केला, पण दुसऱ्या बाजूने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना सहजपणे धावा करता आल्या. "बुमरा सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहे. मात्र, आम्ही केवळ एका गोलंदाजावर अवलंबून राहू शकत नाही. अन्य गोलंदाजांनी जबाबदारी घेऊन संघासाठी योगदान देणे गरजेचे आहे. मोहम्मद सिराज, हर्षित राणा, नितीश रेड्डी, आकाश दीप आणि प्रसिध कृष्णा यापैकी ज्या कोणाला संधी मिळेल, त्याने आपली भूमिका चोख पार पाडणे आवश्यक आहे," असा स्पष्ट संदेश रोहितने गोलंदाजांना दिला. बुमरा आणि सिराजचा अपवाद वगळता भारतीय संघातील वेगवान गोलंदाजांना कसोटी क्रिकेटचा फारसा अनुभव नाही. त्यामुळे त्यांच्यावर फार दडपण टाकणे योग्य ठरणार नाही हेसुद्धा रोहित जाणतो. "आमचे बरेचसे वेगवान गोलंदाज नवखे आहेत. आम्ही बऱ्याच योजना आखतो आणि त्यांच्याशी सतत चर्चा करतो. मात्र, त्यांनी चुकांमधून धडा घेणे गरजेचे आहे. बुमरा दोनही बाजूंनी सकाळ ते संध्याकाळ गोलंदाजी करू शकत नाही. अन्य गोलंदाजांची त्याला साथ आवश्यक आहे. बुमराने पाचही कसोटीत खेळावे अशी आमची इच्छा आहे. मात्र, त्यासाठी त्याच्यावरील ताण कमी करावा लागेल," असे रोहित म्हणाला. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीसाठी भारतीय संघाची दारे खुली असली, तरी त्याने आताच दुखापतीतून पुनरागमन केल्याने त्याच्याबाबत विशेष खबरदारी बाळगली जात असल्याचे रोहित म्हणाला. "मुश्ताक अली ट्वेन्टी-२० स्पर्धेत खेळताना शमीच्या गुडघ्याला पुन्हा सूज आली. त्यामुळे त्याचे पुनरागमन लांबणीवर पडले. आम्हाला कोणताही धोका पत्करायचा नाही. त्याला संघात स्थान दिल्यानंतर कसोटीदरम्यान तो पुन्हा जायबंदी होईल अशी परिस्थिती आम्हाला उद्भवू द्यायची नाही. त्याने १०० टक्के तंदुरुस्त असायला हवे," असे रोहितने स्पष्ट केले. गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात शमीच्या घोट्याला दुखापत झाली. त्यानंतर वर्षभर तो मैदानाबाहेर होता.

### मोठी धावसंख्या उभारणे गरजेचे

नुकतेच त्याने पुनरागमन करताना रणजी सामन्यात ४२ षटके टाकली, तर मुश्ताक अली स्पर्धेत १३ दिवसांत सात सामने खेळले. त्यामुळे राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या वैद्यकीय पथकाकडून शमीला तंदुरुस्ती प्रमाणपत्र मिळणे ही केवळ औपचारिकता असल्याचे मानले जात होते.ॲडलेड येथे प्रकाशझोतात (डे-नाइट) झालेल्या या कसोटीत ऑस्ट्रेलियाने पाहुण्या भारताचा १० गडी राखून धुव्वा उडवला. केवळ अडीच दिवस चाललेल्या या कसोटीत भारतीय फलंदाजांनी सुमार कामगिरी केली. भारताला दोनही डावांत २०० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. "ऑस्ट्रेलियात खेळताना कसोटी सामना जिंकायचा झाल्यास तुम्ही मोठी धावसंख्या उभारणे गरजेचे असते. गुलाबी चेंडूविरुद्ध धावा करणे आव्हानात्मक असेल हे आम्हाला ठाऊक होते.

# हेडला वाद घालणं पडणार महागात

## आयसीसीने या प्रकरणाची दखल घेतली; आता कारवाई होऊ शकते

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ॲडलेड कसोटीत ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील सामन्यादरम्यान वादावादी पाहायला मिळाली. गुलाबी चेंडूच्या या कसोटीत सिराज खूपच आक्रमकपणे खेळत होता. मार्नस लबुशेननंतर त्याचा ट्रॅव्हिस हेडशीही वाद झाला. यानंतर ऑस्ट्रेलियन चाहत्यांची त्याची मैदानात हुर्यो उडवली होती. माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू आणि मीडिया देखील त्याच्यावर टीका करताना दिसले.**




आता सिराज-हेडच्या वादाचे प्रकरण आयसीसीपर्यंत पोहोचले असून ते दोन्ही खेळाडूंवर कारवाई करणार असल्याची बातमी समोर येत आहे.द टेलिग्राफच्या वृत्तानुसार, आयसीसीने आता या प्रकरणाची दखल घेतली असून दोन्ही खेळाडूंना शिस्तभंगाच्या सुनावणीसाठी बोलावले आहे. यावेळी आयसीसी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणार आहे. मात्र, दोन्ही खेळाडूंना कोणत्याही प्रकारच्या निलंबनाचा सामना करावा लागणार नसल्याचेही या वृत्तामध्ये म्हटले आहे. रिपोर्टनुसार, कॅमेऱ्यात कैद झालेल्या फुटेजसाठी आयसीसीच्या आचारसंहितेत फार मोठी शिक्षा नाही. ॲडलेडमध्ये गुलाबी चेंडू कसोटीच्या दुसऱ्या दिवशी सिराज आणि हेड यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली.हेड शतक झळकावून भारताविरूद्ध १४० धावा करत खेळत होता, त्यानंतर सिराजने त्याला यॉर्करवर क्लीन बोल्ड केले आणि पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. यानंतर दोघेही एकमेकांना भिडताना दिसले. हेड आऊट झाल्यावर काहीतरी बोलला, त्यावर सिराजने प्रतिक्रिया दिली.

### गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर हेडने पत्रकार परिषदेत सिराजच्या चांगल्या गोलंदाजीचे कौतुक केल्याचा दावा केला होता. पण बदल्यात मला मिळालेली वागणूक चुकीची होती, मी निराश झालो आहे, असे तो म्हणाला. सिराजने त्याच्या वक्तव्याचे लगेच खंडन केले. हेडने आधी शिवीगाळ केल्याचा दावा त्याने केला. मात्र, खेळाच्या तिसऱ्या दिवशी दोन्ही खेळाडू हे प्रकरण मिटवताना दिसले. सिराजने फलंदाजी करताना हेडशी बोलून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर हा वाद संपल्याचे मानले जात आहे.